# नि.दि.दा.क्र.४२/२०१९ मधील निशाण क्र.३८ वरील आदेश
# (**CNRNO.MHSI**090001862019)

०१. प्रस्तूतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे.

०२. अर्ज व नि.क्र.३९ वरील प्रतिवादींच्या जबाबाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०३. प्रस्तूत अर्जान्वये वादी हे वादपत्रात प्रतिवादी क्र.०९ ते १४ असे पक्षकार व दावा मिळकत–क व त्या अनुषंगाने वादपत्रात परीच्छेद क्र.०४अ, परीच्छेद क्र.०९ चे नंतर नवीन मजकूर, विनंती परीच्छेदामध्ये ब नंतर ब१ असा नवीन मजकूर, तसेच विनंती परीच्छेदामध्ये क रद्द करुन तेथे नवीन मजकूर समाविष्ट करुन त्याप्रमाणे दुरुस्ती करु पाहत आहेत. प्रतिवादींनी अर्जास तीव्र आक्षेप घेऊन असे कथन केले आहे की, प्रस्तूतचा अर्ज केवळ दाव्याचे कामकाज अनिश्चित काळासाठी लांबणीवर टाकण्यासाठी दाखल केला आहे. तसेच, प्रस्तूतचा अर्ज हा दाव्याची चौकशी सुरु झाल्यानंतर दाखल केला असल्याने विधिग्राह्य नाही.

०४. अर्ज व त्यावरील जबाब तसेच उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेता, संचिकेचे अवलोकन केले असता, प्रस्तूतचा दावा हा वाटपासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी दाव्यात हजर होऊन नि.क्र.३० वरील त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये दाव्यास आवश्यक पक्षकार व मिळकतींच्या असंयोजनाची बाधा असल्याचा आक्षेप नोंदवलेला आहे. त्या अनुषंगाने मुद्दा क्र.०४ व ०५ निश्चित करण्यात आलेला आहे. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी हे दाव्यात प्रतिवादी क्र.०९ ते १४ यांना पक्षकार म्हणून व मिळकत–क व त्या अनुषंगाने वादपत्रात परीच्छेद क्र.०४अ, परीच्छेद क्र.०९ चे नंतर नवीन मजकूर, विनंती परीच्छेदामध्ये ब नंतर ब१ असा नवीन मजकूर, तसेच विनंती परीच्छेदामध्ये क रद्द करुन तेथे नवीन मजकूर समाविष्ट करु पाहत आहेत. दाव्याचे स्वरुप बघता प्रस्तावित दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या मागणीच्या अनुषंगाने व प्रतिवादींनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये घेतलेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने असल्याचे दिसून येते. प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास मुळ प्रकरणाच्या स्वरुपात व मागणीत कोणताही बदल संभावत नाही.

०५. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार कोणत्याही टप्प्यामध्ये वादी किंवा प्रतिवादी यांना आपल्या कथनांमध्ये दुरुस्ती करता येते. दाव्यात जरी मुद्दे निश्चित करण्यात आले असले तरी, अद्याप वादींनी पुरावा

दिलेला नाही. दाव्याचे स्वरुप व प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता सदर दुरुस्ती ही उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकारण करण्याच्या अनुषंगाने आवश्यक असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तावित दुरुस्ती मंजुर केल्यास प्रतिवादींच्या न्यायहक्कांवर कोणतीही गदा येईल असे दिसून येत नाही. एकंदरीत प्रस्तावित दुरूस्ती मंजुर करणे न्यायोचित होईल. परंतू, प्रतिवादींनी त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये आवश्यक पक्षकार व मिळकतींचा असंयोजनाचा आक्षेप नोंदवला असतानाही वादीने प्रस्तूतचा अर्ज देणेस बराच विलंब केला आहे. त्यामुळे, अर्ज खर्चासह मंजूर करणे विधिग्राह्य होईल. करिता खालील आदेश :

## – आ दे श –

०१. निशाणी क्र. ३८ वरील अर्ज रक्कम रु.५००/– (पाचशे फक्त) खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

०२. वादींनी प्रस्तावित दुरूस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करुन प्रस्तावित दुरुस्तीतील आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा करावे.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पूर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द समजण्यात यावा.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.03.29 17:22:44 +1000

स्थळ: देवगड ( एस.बी.वाळके )

दिनांकः२९/०३/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.